म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. १४३
सन १९०४
REFBK-0000239
REFBK-0000239

वर्णन.

. ग्रं. सं. ठाणें
कृ-प्रवास
१४३.

रा. रा. लक्ष्मणराव माने.

REFBK-0000239
REFBK-0000239

दामोद ... ली.

मुंबई—इंदुप्रकाश छापखाना.

सन १९०४.

किंमत ६ आणे.

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज
सरकारी कामगिरीनिमित्त मजला अनेक प्रेक्षणीय स्थळ
योग आले, हे श्रीमंतांचे मजवर मोठे उपकार झाले आहेत.
उपकाराचें अंशतः उत्तीर्ण व्हावें या उद्देशानें मी कित्येक प्रे
णीय स्थळांचीं वर्णनें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांपैकींच प्रस्तुत पुस्त
हें होय. हें पुस्तक याचवेळीं प्रसिद्ध करण्याचें कारण, श्रीमंता
स्वारी दार्जिलिंगास जाण्याचें ठरल्यामुळें त्यांस तेथील सर्व प्र
रची माहिती थोडक्यांत सादर करावी अशी माझ्या मनांत
उत्पन्न झाली. व त्याप्रमाणें कामास सुरुवात करून मी
पुस्तक तयार केलें आहे. या छोट्या पुस्तकापासून श्रीमंतांस व इ
प्रवासी मंडळीसही बरीच उपयुक्त माहिती मिळून त्यांच्या प्रवासा
अंशतः तरी मदत होईल अशी मला उमेद आहे.

ल. ग. माने.

# दार्जिलिंग.

सन १८१५ पर्यंत दार्जिलिंगबद्दल कोणासही माहिती नव्हती; ती जागा इतर हवाशीर स्थळांसारखी असेल, असें कोणाच्या ध्यानीं मनींहि आलें नव्हतें; परंतु ह्यावेळेस गुर्खेलोकांनीं सिकीमवर हल्ला केला, व नेपाळीलोकांचें ठाणें उठविण्यास इंग्रजसरकारची बरीच मदत झाली, ह्यामुळें सिकीमच्या राजास थोडासा धीर आला. व इंग्रजलोकांच्या पाठबलानें दार्जिलिंग सहज ह्यांच्या ताब्यांत आलें. ह्या वेळेस नेपाळ व तिबेटच्या सरहद्दीवर कलकत्त्यापासून जवळच विश्रांतिस्थान दार्जिलिंग आहे, असें लार्डबेन्टिंग यांस वाटलें. हें स्थळ फार रमणीय व थंड प्रदेशांत मोठ्या उंचस्थळीं असल्यानें लोकांस दोन दिवस विश्रांति घेण्यास फार सुखकर झालें. तेथें आजारी शिपाई लोकांचें ठाणें बनलें. हें स्थळ इंग्रजसरकारच्या ताब्यांत सन १८३५ सांत आलें.

सन १८४० सांत डॉक्टर कॅंबेलच्या मनांत हें स्थळ राहण्यास योग्य, मनोहर, व सोइस्कर व्हावें, तेथें जाण्यास मार्गांत कोणत्याही अडचणी येऊं नयेत, ह्मणून त्यानें रस्ते व पूल बांधिले, बाजार वसविला, व इतर बांधकामें करविलीं. येथें आंग्लभूमींतील बहुतेक झाडें लावून विशेष वनशोभा आणिवली व व्यापारी लोकांस उत्तेजन मिळत गेलें. चहाची लागवड झपाट्यानें सुरू झाली. ह्यामुळें बरेच गोरे व काळे लोकांनीं ह्या जागेंत लहान मोठीं घरें बांधून येथें आराम घ्यावा असें योजिलें. त्यामुळें ह्या हवाशीर स्थळीं जिकडे तिकडे टुमदार मुबलक घरें एकमेकांवर डोकाऊं लागलीं. अशी भरभराट कांहीं दिवस बिनबोभाट चालली. परंतु सिकीमवाल्यांस व्यापारसंबंधानें मोठी घमेंडी असल्यानें दुसऱ्याच्या स्वाधीन व्यापार नसावा, व सर्व व्यापार आपमुखत्यारीनें चालवावा अशी त्या लोकांनीं शकल काढिली.

२३९

हें काम तेथल्या वजिरानें मनावर घेऊन त्यानें इंग्रजलोकांवर डोळा ठेविला; आणि त्यांच्यांशीं फारच बेपर्वाईनें वागून तो त्यांचा हरेक गोष्टींत अपमान करूं लागला. सर्व मालावर सरसकट जकात बसविली, व इंग्रज सरकारच्या गुन्हेगारांस तेथें आश्रय मिळूं लागला; त्यामुळें पुष्कळ गुन्हे होऊन ते छपूं लागले. पत्रव्यवहार सुरळित चालण्यास आडकाठी आली, व त्यांचें वर्तन फारच उद्दामपणाचें झालें. ह्यामुळें जिकडे तिकडे झोटिंग बादशाही माजली !

असें जरी झालें, तरी इंग्रज सरकारचा व्यापार हळू हळू वाढतच जाऊन आसपासच्या मांडलिक व इतर संस्थानिकांवर त्यांचा पगडा बसत चालला; मुख्यत्वेंकरून कस्तूरी, सोनें, मीठ, टांकणखार, लोखंड, घोडे इत्यादिकांचा व्यापार बराच सरसावत गेला. मस्तीखोर व मोठीं आडसर तिबेटी घोडीं जरी १००० पासून १५००० फूट उंचवट्यावर पैदा झालेलीं होतीं, तरी तीं कलकत्त्यासारख्या सपाट प्रदेशावर टिकूं लागलीं. ह्यामुळें त्यांचा व्यापार चांगला चालला. डॉक्टर क्यांबेलसाहेबांनीं टिटालच्या पायथ्याशीं दरवर्षीं प्रदर्शनादाखल मोठा मेळा जमविण्याचा घाट घातला, व हुन्नरउत्तेजनासाठीं सरकारांतून मोठमोठीं बक्षिसें देवविण्याची सुरुवात केली.

सन १८४९ सालांत डॉक्टर हुकर व डाक्टर क्यांबेल साहेबांच्या स्वाऱ्या वनस्पतीसंबंधीं जास्ती माहिती मिळविण्यासाठीं सिकीमच्या हद्दींतून जात होत्या. तेथील लोकांचा ह्यांच्यावर फारच दांत असल्यानें त्यांस ही संधी चांगली सांपडली. त्या वेळीं त्यांनीं डाक्तर क्यांबेलचे हातपाय बांधून व त्याचे हालहाल करून त्यास जेरीस आणिलें. हुकरसाहेबांनीं पाहिजे तिकडे निघून जावें, असा त्या लोकांचा कल दिसला. परंतु हुकरसाहेब ( स्नेहसंबंधामुळें ) डाक्तर क्यांबेल साहेबांस एकटे सोडून जाण्यास धजेनासे झाले. हें वर्तमान कलकत्त्यास समजल्याबरोबर त्यांची सुटका करण्यास्तव कलकत्ता येथून लष्करी शिपायांची फौज तिकडे रवाना

झाली. असा कावा करण्याचा तेथील लोकांचा मतलब हा कीं, राजाचें चांगलें हित होईल. परंतु हें सर्व कारस्थान दिवाणाचें आहे, असें राजानें इंग्रज सरकारास भासवून त्या साहेबांस सोडून दिलें. या वेळीं इंग्रज सरकारास ६४० चौरस मैल जमीन अनायासें मिळाली! तिचा विस्तार हळू हळू १२३४ चौरसमैलपर्यंत वाढत गेला. आणि थोडक्यांतच दार्जिलिंग सिमल्याचे तोडीचें झालें! चहाची लागवडहि फार वाढली, त्यामुळें वनशोभा आणणारें दाट जंगल होतें तें कमी झालें. चाहाच्या लागवडीचे सुमारें २०० बगीचे तयार झाले. सन १८७८ व सन १८८० सालांत अग्निरथ थेट दार्जिलिंगपर्यंत एकसारखा सुरू झाला; व त्यामुळें व्यापारवृद्धीस उत्तेजन मिळालें. सिंकोनाच्या लागवडीस सन १८६२ सालीं सुरुवात झाली होती, तीस उत्तरोत्तर फार भरभराटी येऊन तिचें रेलवेसहि बरेंच उत्पन्न झालें, व लोकांस दोन पैसे मिळूं लागले. येथें प्रस्तुत अनेक जातींचे लोक दृष्टीस पडतात; त्यांपैकीं कांहींचीं नांवें खालीं दिलीं आहेतः–(१) तेराई प्रांतांतले मेचिस व राजवंशी, ( २ ) लेपचास ( मूळचे रहवासी ), ( ३ ) लिंबूस, भुटिये, मुरमिस, मग्रास, ही मंडळी नेपाळ सिकीम मधली, ( ४ ) थर्मा किंवा भुटानिस हे भूतानचे ( ५ ) तिबेटन हे तिबेटचे ( ६ ) नेपाळी नेपाळचे. व्यापार वगैरे निमित्तानें हे सर्व लोक येथें येऊन राहिले असून त्यांपैकीं बहुतेक मोल मजुरी करून उदरनिर्वाह करीत असतात.

---

## दार्जिलिंग येथें जाण्याचे रस्ते.

सन १८७८ पूर्वींच्या रस्त्यानें नॉर्दन बेंगाल स्टेट रेलवे चालू होण्यापूर्वीं दार्जिलिंगला जाण्यास फारच अडचणी व प्रयास पडत असत. हौऱ्याहून शाहागंजला २१९ मैल ईस्ट इंडिया रेलवेनें जावें लागत असे. तेथून गंगानदी उतरून जाऊन कारागोलाला जावें

लागत असे; तेथून बैलगाडीनें डिंग्राघाटपर्यंत गेल्यावर तेथील नदी ओलांडून पुन्हां बैलगाडींत किंवा पालखींत बसून पुरनिया, किसनगंज, टिटालिता आणि सिलिगुरीपर्यंत जावयाचें. येथून एक सारखा चढाव पंखाबारी रस्त्यानें लागतो. तो करसीयाँगला जाऊन मिळतो. हा सर्व प्रवास करण्यास त्यावेळेस साहा सात दिवस सहज लागत. परंतु आतां फक्त २४ तासांत सहज जातां येतें. हल्लीं कलकत्त्याहून दार्जिलिंगला जाण्यास अग्निरथामुळें रस्ता अत्यंत सुलभ झाला आहे. मोठ्या भयंकर व नागमोडीच्या रस्त्यानें जातांना बैलगाडी किंवा मेण्याचा उपयोग केल्यानें कितीतरी हाल, अपेष्टा, खर्च व प्रसंगीं जिवाचीहि हानि होत असे. जेथें असल्या वाहनांमुळें जाण्यास आठवडेच्या आठवडे लोटत होते, तेथें आतां एक दिवसांत मोठ्या आनंदानें व अल्प प्रयासानें जातां येतें. दार्जिलिंग हें समुद्रसपाटी पासून ८००० फूट उंचीच्या प्रदेशांत आहे; तेथें नेहमी बर्फानें व मेघानें आपलें ठाणें बसविलें आहे. सध्यां प्रवास करणें तो टपाल गाडीनें करणें सोईस्कर आहे. सर्व सामान अगोदर एक दिवस रवाना केल्यास तेथें गेल्यावर कोणत्याहि प्रकारची गैरसोय होत नाहीं. कोणी दुखणेकरी जाणार असल्यास त्याच्यासाठीं निराळीच आराम घेण्यासारखी गाडीमध्यें सोय केलेली असते. मध्यंतरीं आगबोटीवर चढतां उतरतानां देखील आराम खुर्चीचा उपयोग होतो. कलकत्त्याच्या सियालडा स्टेशनपासून संध्याकाळीं चार वाजतां गाडी निघते, ती गंगा नदीवरील डामाकुडिया घाटास नऊ वाजतां जाऊन पोहोंचते. ११६ मैल दरम्यानचा देखावा मोठा कंटाळवाणा होतो. बराकपूरपर्यंत जेम तेम बरें वाटतें, परंतु पुढें नुस्तीं भाताचीं शेतें व गाडीच्या दोन्ही बाजूनीं चर खोदलेले, व त्यांत पाणी भरलेलें दृष्टीस पडतें. ह्या विस्तीर्ण सपाट जमिनीवर मधून मधून सुपारी व नारळाच्या झाडांनीं वेष्टित झोपड्या किंवा चिमुकलीं गांवें नजरेस पडूं लागतात. एकदां मेघवृष्टि झाली ह्मणजे जिकडे तिकडे जसा काय हिरवा गार गालीचाच

पसरला आहे असें दिसतें. सुमारें पाऊण तासानें नियाहटि स्टेशन येतें. येथें दोन रेलवेंचा मिलाफ झाला आहे. ह्याठिकाणीं हुगळी नदीचा पूल पाहण्यासारखा आहे. पुढें बोगोला स्टेशन येतें, येथें गाडी कांहीं वेळ थांबत असल्यामुळें चहापाणी घेण्याची सवड असते. चार पांच तासांनीं डामाकुडीया घांटावर गाडी थडकली, कीं तींतून उतरून गंगा नदींत तयार असलेल्या आगबोटींत खुशाल जाऊन बसावें. हींत विजेच्या दिव्यांचा उपयोग केला असल्यानें आसपासचा देखावा फारच विलक्षण दिसतो. नदीस ओढ फार असल्यानें व प्रवाहाच्या जोरानें रेती कोठें कमी कोठें जास्ती झाल्यानें पाण्याच्या खोलींत फरक पडतो. त्यामुळें आगबोट फार जपून हांकावी लागते. गंगानदीचें पात्र सुमारें दोन अडीच मैल रुंद आहे. चढण्या उतरण्याच्या जागा नदीच्या ओघाप्रमाणें बदलाव्या लागतात. आगबोटींत फराळ वगैरे करण्यास सोय चांगली असतें. ज्यांस इंग्रजी चालीचें जेवण चालत असेल, त्यानीं तेथल्या नदींतला, हिल्सा मासा खाऊन अवश्य पहावा. समोरच्या तीरास सारा घाट ह्मणतात. तेथें आल्याबरोबर नॉर्थईस्ट बेंगॉल स्टेट रेलवेची गाडी तयार असते. त्यांत जागा सांपडली कीं लगेच पथारी आंथरावी, व निद्रावश व्हावें. प्रातःकाळीं सुमारें सात वाजतां जळवाईगुरी स्टेशनावर गाडी कांहीं वेळ थांबते. तेथें प्रातर्विधि व मुखमार्जन करून थोडासा फराळ करणें हितावह आहे. त्या प्रदेशांत तागाचें उत्पन्न दांडगें आहे. ह्या प्रदेशांत पर्जन्य फारच असल्यानें हवा अति दमसर असून ती हिंवतापास उत्तेजन देते. येथें बहुतेक बंगले उंचवट्यावर बांधलेले असतात. जलपाईगुरी आणि सिलीगुरीच्या दरम्यान वाघाची शिकार बरीच सांपडते. उजव्या बाजूस आसामचा प्रांत लागतो; तिकडे मोठें दाट जंगल आहे. तेथें हत्तीची शिकार मिळूं शकते. येथून हिमालयाचे दक्षिणभागाचे मोठमोठे कडे व सुळके हिमाच्छादित व गगनचुंबित वृक्षांनीं

वेष्टिलेले दृष्टीस पडतात. जलपाईगुरी येथें वर्षातून दोन तीन वेळां हत्तींची विक्री होत असते. आपण ३०० फूट उंचीवर सिलिगुरी येथें सकाळीं दोन तीन वाजतां आलों कीं, येथून दार्जिलिंगला जाण्यास दार्जिलिंगाहिमालय लाईन लागते. आपणास वर जाणें असेल, तर गाडींत बसतांना ओव्हरकोट व रग मात्र जवळ ठेवून बाकीचें सामान ब्रेकमध्यें ठेवावें, ह्मणजे बसण्या उठण्यास त्रास होणार नाहीं. कारण कीं, ह्या रेलवेच्या गाड्या फारच लहान असतात. वेग सगळा ६–किंवा ७ मैल दर तासास आहे. काम टुमदार असून, मोठें भक्कम आहे. चढाव दरेक तासाला सुमारें हजार फुटांचा ठेवला आहे. जों जों वर जावें तों तों हवेमध्यें गारठा येत जातो, व वनश्री जास्ती खुलत जाते. हे लहान डबे पाहून असें वाटतें कीं जणुं काय हा पोरखेळच आहे! परंतु हीच चिमुकली गाडी जेव्हां आठ हजार फुटांच्या शिखरावर नेऊन पोहोंचविते, त्या वेळेस ह्या गाडीची खरी योग्यता ध्यानांत येते. सिलिगुरीपासून निघाल्यावर सातआठ कोस तेराई प्रदेश लागतो, तेथें हिंवतापाची सांथ नेहमीं असते. हल्लीं जिकडे तिकडे चहाच्या ताटव्यांतून जास्त झालेलें पाणी बाहेर काढून दिल्यामुळें ह्या रोगाचा फार त्रास होत नाहीं. तेराई पट्टा सतलजपासून आसामांत ब्रह्मकुंडापर्यंत आहे. ह्या पट्ट्यांत बहुतकरून साग पुष्कळ उत्पन्न होतो. येथल्या प्रदेशांत मेची लोकांची वस्ती फार आहे. ह्या लोकांस ही हवा बाळकडूसारखी आहे. सिलगुरी सोडल्यावर थोड्या वेळानें महानदीचें पात्र लागतें, ह्या नदीवरील लोखंडी पूल ७०० फूट लांबीचा असून त्यास सात कमानी आहेत. तो पहाण्यासारखा आहे. ही नदी नेहमीं खळखळ करणारी आहे. पाणी स्फटिकासारखें स्वच्छ असून तें मोठ्या वेगानें वाहत असतें; दोन्ही बाजू गर्द छायेनें भरून गेल्यामुळें वनशोभा नेत्रांस फारच आनंदविते. दोन्ही बाजूस चहाच्या लागवडीचे ताटवे व बंगले लागून गेले आहेत. सात मैलांनंतर सुकनास्टेशनापासून चढाव सुरू होतो.

सुकना स्टेशन सोडल्यावर जंगल फारच दाट होत जातें. साल, तुठा सागाचीं दुसरीं भव्य व गगनचुंबित झाडें आर, किडस व इतर वेलींनीं वेष्टित असल्यानें वनशोभा उत्तम दिसते. ह्या जंगलांत रानटी मस्त झालेले हत्ती, गेंडे, वाघ, चित्ते, गवे, हरणें, डुकरें, लांडगे, रानकुत्रीं, माकडें आणि इतर जनावरांचा मोठा भरणा आहे. एकदां रानटी हत्तींच्या झुंडीनें आगगाडीस परत सुकना स्टेशनाकडे वळवून लाविलें होतें, असें सांगतात. माशीर नांवाचा मासा टिस्टा नदींत सांपडतो. नऊ मैल आल्यावर पंचकिल्ला हें स्थान लागतें. ( येथें पांच पोष्टस्तंभ आहेत एक कारागोला रस्त्याचा व बाकीचे चार चौकीचे ) येथें पूर्वीं हिंवताप पुष्कळ असे, व त्यामुळें हा पायरस्ता व सडक करण्याच्या कामावर आलेले मजूर या रोगाचा तडाक्यांत किती सांपडले ह्याचा अंतच नाहीं! पोष्टाजवळ चढाव बराच ह्मणजे १२–१३ मैल आहे. ह्यामुळें वनटॉंग स्टेशनावर गाडी थांबते, व सुमारें तेराव्या मैलाच्या अलिकडे एंजिनास पाणी पाजावें लागतें. त्यामुळें त्या भागांतील देखावा पहाण्यास बराच अवकाश सांपडतो. ह्या ठिकाणीं गोल्डन फर्न फारच उगवतो व कोळसाहि बराच नजरेस पडतो. येथून गाडीचा रस्ता दक्षिणेकडे वळतो, तो एक मोठ्या सुळक्यावर जातो ; तेथें एक बराच नागमोडीचा वळसा लागतो, त्यावेळीं गाडी अंडाकार फिरून पुन्हां ८३० फूट खालच्या बोगद्यांतून दुसऱ्या बाजूकडे वर चढते. येथून गाडी पुन्हां उत्तर व पूर्व दिशांच्या दरम्यान चालते. थोडा वेळ जुन्या रस्त्याच्या धोरणानें चालते, परंतु कांहीं वेळानें त्याच्या खालून रस्ता केला आहे, त्यावरून जाते. पोष्टाजवळ (जुना चुना भट्टीडॉक बंगला ) सोळाव्या मैलावर एक वळसा घ्यावा लागतो. पुढें अगदीं उत्तरेकडे गाडी जाऊं लागते. त्यावेळीं सृष्टिसौंदर्य फारच मोठ्या प्रमाणांवर दिसतें. पूर्वेस भुटान डोंगराच्या ओळी दिसतात. आणि आसपासचीं शिखरें, व टेंकड्या चहाच्या लागवडीनें भरलेल्या दिसतात. उत्तर दिशेला टिस्टानदी प्रदेश किंवा शेर बेट ह्मणतात.

१७॥ मैलाच्या पोष्टाजवळ पुन्हा वळसा घ्यावा लागतो. २० व्या मैलाच्या पोष्टवर डोंगरावरचें दुसरें स्टेशन तिनदारिया येतें, तेथें गाडी १० मिनिटें थांबते. स्टेशन समुद्र सपाटीपासून २८२२ फूट उच्च आहे. येथें हिंवतापाचा त्रास होत नाहीं. तिनदारिया सोडल्यावर आणखी नागमोडीचा रस्ता येतो, ह्यावरून जातांना सिटोंग हिल (५५७४) फुटांची दरी लागते. ह्या शिखराचें मूळ महानदी आणि टिस्टा नदीमध्यें आहे. ह्याच्या दरम्यान रानटी हत्ती व हरणाचे कळप असतात. ह्या मुलुख्याचें अगदीं उंच शिखर महालडीराम ( ६५०० फूट ) आहे. येथें चहाची लागवड होत असते. २३ व्या मैलावर आणखीं नागमोडीचा रस्ता येतो तेथून शियाबरी स्टेशन जवळच आहे. येथल्या मुलुख्यावर लेपच्या लोकांच्या बऱ्याच समाधी नजरेस पडतात. शियाबारीस्टेशनाची उंची ३५१० फूट आहे. २४ व्या मैलावर पुन्हा नागमोडीचा रस्ता येतो. येथून जुना रस्ता बराच मैलपर्यंत लागतो. २५ $\frac{1}{2}$ मैलांवर एंजिनास पाणी पाजण्याचें स्टेशन आहे. येथून जमीन वगैरे सर्व निराळ्या तऱ्हेचें दिसतें. येथून थोड्याच अंतरावर एक मोठा पाण्याचा धबधबा आढळतो; त्यास पागलझोरा ह्मणतात. पर्जन्यकाळांत येथें रस्ता सुरक्षित रहाणें फार कठिण आहे. खालच्या खिंडींतून पाण्याचा प्रवाह किती जोरानें जातो हें अवश्य पाहण्यासारखें आहे. येथें हरणाची गुरड, रामघेटे व अस्वलाची शिकार फार चांगली मिळते. येथून दार्जिलिंग निमें राहतें. येथें सडकेचा रस्ता करितांना ५० फूट भरून काढावा लागला. येथेंच गुमती वळण लागतें. त्याची उंची ४०४० फूट आहे. येथें महानदी व क्रॉसिंग स्टेशन आहे; येथून पावसाळ्यांत, पागलझोरा १५० फूट उंचीवरून पडतो. आतां आपण जरा पश्चिमेकडे वळूं. येथून खालचा सिलगुरीपासूनचा मोठा मनोहर देखावा दृष्टीस पडतो. २९॥ मैलाच्या पोष्टाजवळ गेल्यावर पुष्कळ खडक नजरेस पडतात. त्यांपैकीं आर्टिलरी, मॉन्सरॉक व ग्लाडस्टनरॉक हे मुख्य होत. येथून

मग आपण एक मैलावर करसीयांग येथें येतों. ५००० फूट येथून दक्षिणेस इगल्स क्रेग आहे; आणि तें पहाण्यासारखें आहे. कर्सियांग ही जागा व्यापाराच्या योगानें बरीच प्रसिद्धीस आलेली आहे. येथें डॉकबंगला, चर्च, मुलांची शाळा, कानवेन्ट स्कूल आणि चांगलें हॉटेल आहे. येथें गाडी अर्धा तास थांबते. त्यावेळेस जेवण खाण करण्यास कांहीं हरकत नाहीं. येथें आंग्लभूमींतलीं फुलझाडें जिकडे तिकडे उगवलेलीं दृष्टीस पडतात. क्लारेन्डन हॉटेलवरून देखावा चोहींकडे नजर फेंकिली तर फारच मनोहर दिसतो. पश्चिमेकडे नेपाळाकडील पर्वत आणि नेपाळी लोकांचा सरहद्दीवरील येलाम किल्ला दिसतो. दक्षिणेस खालचा सपाट प्रदेश दिसतो. जर आकाश निरभ्र असलें, तर उत्तरेकडील हिमाच्छादित शिखरें व पर्वतांच्या ओळी दृष्टीस पडतात. त्या सर्वांत उंच शिखर कांचनजंगा फारच रमणीय दिसतें. खालच्या दर्‍यांत चाहाचे बाग, सिंगल माउंड, टिवियट व स्प्रिंग साइड इत्यादि भाग चांगले दिसतात. येथें सरकारखर्चानें रेलवेचे मजूर इत्यादि लोकांसाठीं शाळा घातली आहे. तेथें मुलें आनंदी व टवटवीत दिसतात. येथली हवाही चांगली आहे. व ज्यांस आपली मुलें यूरोपाला पाठविण्याची शक्ति नसेल, त्या कामदारांनीं आपलीं मुलें बेलाशक ह्या ६००० फूट उंचीच्या जागेंत ठेवावीं.

कोठें कोठें कड्यावरून, कोठें कोठें मोठ्या किर्रझाडींतून व खिंडींतून घाटमाथ्यावर गाडी जाते, त्यावेळेस मनामध्यें नाना तर्‍हेचे विचार उत्पन्न होतात. जसजशी गाडी चढावयास लागते, तसतसी ती जणूं काय धांपा टाकित व किंकाळ्या फोडीत चालली आहे, असें वाटतें. कित्येक वेळां भुलभुलावणी–सारखें होऊन जातें, जेथें सुळक्यावर व तुटलेल्या कड्यावर गाडी जाते, तेथें खंडाळ्यातील दस्तुरीवर जसें पुढें पाठीमागें फिरावें लागतें, तसें येथें बरेच ठिकाणीं करावें लागतें. खरोखर असें उत्तम सृष्टिसौंदर्य दुसरीकडे पहाण्यास मिळणें फारच दुर्लभ आहे. आपल्यावर मोठमोठालीं

मेघाच्छादित पर्वत शिखरें जणूं अबदागिरीचें काम बजावीत आहेत असें दिसतें. येथें मोठा दरा, तेथें मोठी खिंड, येथें मोठा धबधबा किंवा गगनचुंबित वृक्षांचें दाट रान, तर तेथें पक्ष्यांचा मंजूळ शब्द ऐकूं येतो. ह्याप्रमाणें नंदनवनाची शोभा पहात पहात आपण जों जों जातों, तों तों तहान भूक विसरतों. व घटकाभर ह्या सृष्टिसौंदर्यांत गर्क होऊन जातों. आपण बरेच वर चढलों, ह्मणजे खालचा मनोहर देखावा दृष्टीस पडतो. जणूं काय एक हिरवा गालिचाच पसरला आहे, व त्यावर बिलोरी सामान लावून दिलें आहे असा भास होतो.

केरसंग जवळ जवळ आलें कीं, हवा पातळ होते, व मनास आनंद देणारी भासते. यावेळीं माध्यान्ह टळून क्षुधा शांत होण्याची जागाहि जवळ जवळ येऊं लागते. येथें क्लॅरेंडन हॉटेल आहे. येथून दार्जिलिंग सुमारें वीस मैल राहतें. क्लॅरेंडन हॉटेल समुद्रसपाटीपासून सुमारें ५००० फूट उंचवट्यावर आहे. येथून जो प्रवास होतो, तो मोठ्या भव्य विस्तीर्ण वनशोभेंतून होतो. जंगलांतील दाट झाडांनीं बनलेलीं बनें हजारों फुटांखालीं चिमुकलीशीं दिसतात. कित्येकवेळां गाडीचा मार्ग पाहिला, ह्मणजे एखाद्या सुळक्यावरून खालीं फारच खोल एकसारखा उभा जमिनीस लागलासा दिसतो. सूर्याचें तेज चांगलें असून आकाश निरभ्र असलें तर खाचित उत्तरेकडील हिमालयाची शुभ्र गगनचुंबित शिखराची ओळ फारच सुरेख दिसते; ती पहातांना डोळे दिपतात. व जणूं काय सर्व हिमालयभर हिरे, माणकें पसरलीं आहेत असा भास होतो. अशी वनशोभा पाहिल्यावर मनावर सुंदर ठसा उमटल्याखेरीज कधीं तरी राहील काय ? येथून आपण ७३७२ फूटांच्या उंचीवर गुमयेथें आल्यावर दार्जिलिंग सगळें चार मैल राहतें. येथून जरा उतार लागतो. १२० मैल कलकत्त्यापासून डामाकुंडी घाट, ( १॥ मैल नदीचा प्रवास ) १२७ मैल सारटघाट ते सिलिगुरी; व ५० $\frac{3}{4}$ मैल सिलिगुरीपासून दार्जिलिंग असें अंतर आहे.

अ.क्र. २८

## दार्जिलिंग स्टेशन.

दार्जिलिंग हें कड्यावर वसलेलें असून त्याची उंची ६५०० पासून ७५०० फूट आहे. क्षेत्रफळ १२३४ मैल, लोकवस्ती ९४७१२; सीमाः—राजशाही प्रातांत दार्जिलिंग आहे. दार्जिलिंगच्या उत्तरेस रमान मोठी रंजीत नदी, टिस्टा नदी, फुफुचू ऋषी, रंगपु पर्वतांतले नद, नाले आणि ओहोळ; व पूर्वेस नेचु आणि डेचु नद्या, महानद, गल्मा नद्या; दक्षिणेस पश्चिमद्वार आणि जल्पा गुर्फरीप्रांत, पश्चिमेस उंच उंच पर्वतांच्या ओळी, (ज्याच्या पलीकडे स्वतंत्र नेपाळचा प्रदेश लागतो.) दार्जिलिंग हें दक्षिणेपासून उत्तरेकडे पसरलेलें आहे. मध्यभागीं चौरस्ता घेतला ह्मणजे उजवीकडे कडा आहे, त्यास 'लबाँग' ह्मणतात; व डावीकडे कडा आहे; त्यास 'बर्चहिल' ह्मणतात. खुद्द दार्जिलिंग जेथें वसलें आहे, तो सुळका फार अरुंद व चिंचोळा आहे. पश्चिमेकडच्या खालच्या कड्यावर एडन आणि जुबिली सानिटेरियम आहे. तसेंच पोलीस ठाणें, बाजार, रेलवे स्टेशनहीं आहेत. ह्याच्याखालीं तुरुंग, बोटानिकल गार्डन आणि तद्देशीय गरीब लोकांची झोंपडीं वगैरे आहेत. तेथील सर्व घरें आणि बंगले वगैरे विटांची किंवा दगडांची असून त्यांचीं छपरें लोखंडाच्या पत्र्यांचीं आहेत. स्त्रबरी, (लेफटनेन्ट गव्हरनर साहेबाचें) नवीन सरकारी कचेऱ्या, एडन सॅनिटेरियम, डेप्युटी कमिशनर साहेबांचा बंगला कुचबिहार महाराजांचे बंगले व इतर कांहीं बंगले फारच मनोहर आहेत. गुमस्टेशन सोडल्यावर दार्जिलिंगकडे येतानां वनशोभा फारच रमणीय आहे. आब्झरवेटरीहिल (टेंकडी) सर्वांत उंच आहे; येथून जिकडे तिकडे नजर फेंकतां येते. येथें सेंटपालचें स्कूल आहे. ह्याच्या पायथ्याशीं बऱ्याच अंतरावरचा रस्ता लागतो तेथें ब्यॅन्डस्टॅन्ड आहे. येथें संध्याकाळीं बाजा वाजत असतो. व मंडळी फेरफटका करून आल्यावर येथें जरा करमणुकीसाठीं व विश्रांतीसाठीं बसतात. मॉल आब्झरव्हेटरीहिलच्या भोंवती आहे;

तेथून आसपासचा सुंदर देखावा वरपासून थेट खालपर्यंत दिसून येतो. व आसपासच्या चहाच्या लागवडीचे ताटवे लॅबाग कड व सर्वांवर ताण (फार दूर दोन शिखरांचा) कांचनझंगा शिखरा नजरेस पडतें. मॉलच्या सभोंवतीं फारच टुमदार व नीटनेटकीं अशीं आरामस्थानें आहेत. मॅालच्या खालीं बर्चहिल रोड आहे. हा रस्ता वृक्षांनीं आच्छादित असल्यानें फारच मनोहर दिसतो. ह्या रस्त्याला वळणें फार, व त्याप्रमाणें आसपासच्या भागांतील सृष्टिसौंदर्य हें चढत्याप्रमाणावर दिसतें. गव्हर्नमेन्ट हाऊस जवळ क्रिकेटग्राउंड, टाउनहॉल व सेंटआंड्रूसचर्च हीं आहेत. सपटेंबरच्या अखेर व अक्टोंबरच्या प्रारंभीं दुर्गापूजेचे सणानिमित्त सुट्टी असल्यानें वंगवासी व इंग्रज लोकांच्या झुंडींच्या झुंडी सण साजरा करण्यासाठीं येथें येतात. ह्या आठ दहा दिवसांत क्रिकेट म्याचेस्, निशाण मारणें, फ्यानसी बॉल, फेट, नाटकें व इतर गमती सुरू होतात, व हे दिवस मोठ्या आनंदानें जातात. जणू काय दिपवाळीची प्रथम सुरुवात येथेंच होते. टाऊन हॉलच्या जवळच सेंट आंड्रू व ओल्ड चर्च हीं आहेत. खबेरीच्या खालीं पश्चिम बाजूला नवें सेक्रेटरीयट ऑफिस आहे. ह्यांत डेप्यूटी कमिशनरचें ऑफिस व इतर ऑफिसें आणि न्यायमंदिरें हीं आहेत. ह्याच्याचजवळ यूरोपियन लोकांची स्मशानभूमि आहे. ह्याच्या जवळ जरा वरच्या बाजूस कॉनव्हेन्ट स्कूल मुलामुलींसाठीं निरनिराळें जेसुइट मंडळीच्या साह्यानें चाललें आहे. ह्याला लागून एक छोटेखानी रोमन क्याथलिक च्यापेल आहे. सेंटआंड्रूचर्च, टाऊनहॉल व इडन सॅनिटेरियनच्या जरा खालीं मध्येंच बोटॅनिकल गार्डन् आहे. हा बाग पूर्वी सहा कोसांवर रंगारून आहे तेथें होता. तो माजी बेंगालचे ले. ग. सर रिचर्ड टेंपल साहेबांनीं येथें आणिला व त्याची टापटीप ठेविली. पाइन, सिडार, लारचेस्, स्प्रुसेस, वगैरे वनस्पति आहेत. येथें कोठलीहि वनस्पति आणिल्‌ ‑ी वाढते. ह्याचें कारण येथील हवेंत तसाच कांहीं गुण आहे. ह

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे 
239

गिन्यांत एक ताईत भारलेला असतो. जेव्हां लेपचा स्त्रिया दागिनें व कपडेलत्ते घालून तयार होतात, तेव्हां त्या पाहण्यासारख्या असतात. वरचा झगा भपकेदार असून पुढें रुप्याच्या सांखळीनें बांधलेला असतो; तिचा गळा सर्व रुप्याच्या दागिन्यांनीं गच्च भरलेला असतो; तिच्या डोक्यास लालभडक फडकें गुंडाळलेलें असतें. त्याच्यांत गुंजा, रत्नें, कांचांचे मणी गोंवलेले असतात. हा पोशाख फारच शोभिवंत आणि रमणीय दिसतो. लेपचास हे मोठे खादाड असतात; त्यांस खाण्यास पाहिजे तें असलें तरी चालतें. जनावर, वनस्पति, गोगलगाय, सुरवंट, कुत्र्यांचे मांस वगैरे कांहीं असलें तरी चालतें. त्यांचा भात लाल व जाडाभरडा असतो; तो शिजविल्यावर गिळगिळीत लागतो, पण ते लोक तो तसाच खातात.

डुकराच्या मांसावर त्यांची फारच झडप असते. दुखण्यानें मेलेल्या गुराचेंहि मांस त्यांस प्रिय आहे. त्यांचें शिजविणेंही घाणेरडेंपणाचेंच असतें. तें रुचकर करण्यासाठीं मसाला, तेल इत्यादि घालतात.मापल किंवा कांहीं लाकडांच्या गांठींपासून ते लोक प्याले करितात. हे प्याले चमत्कारिक, सुरेख रुप्यानें मढविलेले व सफाइदार असतात. त्या प्याल्यांत हे लोक दारू पितात. ही दारू मुख्य धान्यापासून काढितात. त्यांस चहा पिण्याची फारच संवय असून ते इंग्लिश चालीप्रमाणें चहा तयार करितात. तिबेटसाठीं केलेल्या ब्रिकटी लोणी, सोडा व मीठ ह्यांत मिळून शिजवितात, व खातात. त्यांचें वाजविण्याचें यंत्र ह्मणजे बांसरी किंवा पांवा होय. तालसुरांत ते चांगले असतात. प्रवास करतांना किंवा थकल्यावर लेपचा लोक बराच वेळ गप्पा मारीत बसतात, गातात, अगर पांवा किंवा अलगुजा वाजवितात. यांच्यांत लग्नें लहानपणीं होतात. पैसा देऊन किंवा मोलमजुरी करून ठरलेली रक्कम सासऱ्यासह हप्त्यांनीं देण्याचें जांवई कबूल करितात. लग्नाची गांठ इमानानें बाळगतात- घरांतलीं सर्व कामें, शेतांतलीं कामें, हीं मुलांवर व बायकांवर सोपलेलीं असतात. पुरुषांनीं घरांत बसून मुलांचा पाळणा हालवीत

असावें. स्त्रियांनीं खणावें, कुदळावें, वगैरे कामें करावीं. ह्या लोकांत देवी काढण्याबद्दल फारच काळजी घ्यावी लागते. ह्या लोकांत रोगराईची भीति फारच कमी. पावसाळ्यांत प्रारंभीं व शेवटीं दरींत राहिल्यानें संधिवात किंवा हिंवताप लागतो. ह्या पलिकडे कोणतेंहि दुखणें त्यांस पछाडीत नाहीं. त्यांस मरणाची विलक्षण प्रकारची भीति वाटते. ते लोक शवास मुठमाती देतात, किंवा जाळतात. धर्मासंबंधानें अठरा धान्याचें कोडबोळें समजावयाचें. ह्मणजे हे लोक बौद्ध, हिंदु, शाक्तमार्गी वगैरे असतात. त्यांच्यांत प्रत्येक जातींत एक उपाध्याय असतो, तो भूतपिशाच्चांस मंत्रसामर्थ्यानें हांकून लावितो. हे उपाध्याय भिक्षुकीचा धंदा करितात, गातात, नाचतात, बागडतात, आशिर्वाद व शाप देतात. सोंगेंही घेतात, व डोंबाऱ्याचा खेळहि करून दाखवितात. कित्येक मानी प्रार्थना चक्र घेउन फिरतात, कित्येक घाणेरड्या चिंध्या फाटक्या तुटक्या नेसून फिरतात. कित्येक डोंगराच्या शिखरांवर खडकांत किंवा राईंत वास करतात. त्यांचा प्रार्थना केल्यानें ते प्रसन्न होतात, व त्रास देत नाहींत. लेपचा लोक मोठे इमानी, डोंगराळ प्रदेशांत मेहनत करण्यास व चढण्याउतरण्यास जबरे शक्तिमान् असतात. जंगलासंबंधानें पूर्ण माहितगार, नेहमी आनंदी स्वभावाचे असतात. जरी ते अशक्त आहेत, तरी त्यांचा स्वभाव भांडखोर नसल्यानें ते नेपाळी व भुटिया लोकांच्या तडाक्यांतून पुष्कळवेळां वांचले आहेत. त्यांच्या स्त्रिया मुलांचा संभाळ फारच चांगल्या प्रकारें करितात. व घरांतलें काम करण्याससुद्धां त्या लायक असतात. हे लोक मायाळू, आज्ञांकित, व हुशार आहेत. हे आपल्या ल्हाध्या चाकूनें आपलें घर तयार करितात. हे फारच इमानी असतात. ह्यांचा दुर्गुण ह्मटला ह्मणजे छाकटेपणा व हलगर्जीपणा हा होय. हे लोक अर्धे न [illegible] उघडेबोडके सुद्धां तुमच्याबरोबर तहानभुकेस न जुमानतां [illegible] एकसारखे फिरतात; व तुमचें काम मोठ्या आनंदानें [illegible] करितात, त्या वेळेस तुमच्या मनांत त्यांच्याविषयीं किती [illegible]

होईल बरें ! हे सर्व कामांत पुढारी असतात; तुमच्याबरोबर येऊन सर्व सामान डोक्यावर घेऊन, तुमचे तंबू ठोकून देण्यास व तु- ह्मांस स्वयंपाक करून जेऊं घालण्यास तयार असतात. ह्याप्रमाणें ताठा न बाळगतां पडेल तें काम करण्यास तयार असतात. त्याच- प्रमाणें १६००० फुटींच्या उंचीवर देखील वस्त्रप्रावर्ण साधारण असलें, तरी शेकटीशिवाय उघड्या मैदानांत निजतात; व प्रातः- काळ झाला कीं, तुमची चाकरी करण्यास तयार असतात; पण त्यांच्यावर नेहमीं नजर ठेवावी लागते; नाहींतर घरांतल्या बऱ्याच जिनसा नाहींशा होतात.

---

## लिंबूस लोक.

लिंबुस लोक लेपचा लोकां प्रामणेंच आहेत; परंतु त्यांच्यांत कांहीं गुण विशेष आहेत. ते लोक पीळदार व सडपातळ असतात; ते वेण्या- फण्या करित नाहींत व दागिन्यांचाहि उपयोग करित नाहींत. बाण, चाकू यांच्याऐवजी कुकेडी किंवा नेपाळी जंबियासारख्या एका श- स्त्राचा ते उपयोग करितात. ते आंगांत तंग कुडतें व पोकळ चो- ळणा घालतात; आणि कंबरेस दुपेटा गुंडाळतात. डोकीला पिं- वळया रंगाची टोपी घालतात; त्यांचे डोळे फारच लहान असून तिरकस असतात. लिंबूस लोक पूर्वी नेपाळांत राज्य करीत होते; परंतु गुरखे लोकांनीं त्यांस तेथून धुडकावून लावलें. ते धीट व शिपाई गडी आहेत. ते जात्या क्रूर असल्यामुळें, वेळ आल्यास ह्मातारे- कोतारे, अशक्त स्त्रिया व मुलें यांस सरसकट तरवारीनें छाटून टा- कण्यास मागें पुढें पाहत नाहींत. त्यांपैकीं पुष्कळ गुरखे पलट- णींत दाखल झाले आहेत. त्यांच्या व लेपच्या लोकांच्या रीति- भाती साधारण मिळत्या आहेत. ह्मणून रोटी व बेटीव्यवहार एक मेकांत होत असतो. ते मेलेल्या मनुष्याबद्दल शोक करून त्यास जाळतात, किंवा मूठमातीहि देतात. मग त्याच्यावर एक ओटाक- रून मोठा दगड ठेवतात; व त्याच्या आसपास खुंट्या मारून ल-

ह्यानसें कंपाउंड करितात; त्यांत दगड व अंडीं टाकून देतात. हे लोक बुद्धधर्मानुयायी आहेत; व ह्यांचे धर्मगुरु लेपच्या लोकांपेक्षां श्रेष्ठ वर्गातले आहेत. यांचा लग्नविधि मेचिस लोकांसारखा असतो. याच्यांत पांचाळीसारखे एका स्त्रीनें पुष्कळ वर करण्याची चाल आहे. ह्यांची भाषा लेपचा लोकांपासून भिन्न आहे. व तिला लिपि नाहीं. दुसरी जात भुटिया लोकांची आहे, ती सर्व दार्जिलिंगभर आहे. ते लांकूडफोडे, पाणी आणणारे भिस्ती, मोलमजुरी करणारे हमाल, आणि जंपन किंवा रिक्षावाहक आहेत. ह्यांचा भुटानशीं कांहीं एक संबंध नाहीं. ही जात कित्येक लोक टिबेटांतून, कित्येक भुटानांतून, व कित्येक सिकीमहून येथें येऊन वसली आहे. आणि चौथी, टिबेट, भुटान आणि लेपचा ह्यांच्यापासून झाली आहे. ही फारच चांगली जात आहे, परंतु फार शिरजोर, भांडखोर, त्रासदायक आणि क्रूर अशी आहे. सारांश, ह्या लोकांच्या चालचलणुकीबद्दल सांगावें तितकें थोडेंच! भुटानी किंवा धर्मभुटिये हे लोक दार्जिलिंग येथें काबाडकष्ट करणारे व मजूर आहेत. सिकीम भुटिये ज्यांस 'आराटस' ह्मणतात, ते त्रासदायक, दंगेखोर आणि छाकटे आहेत. ह्याचप्रमाणें खर्ची सर्व भुटियेलोक असतात. हे सर्व लोक घाणेरडे व गलिच्छ असतात. हे अंगांत एक लोंकरीचा झगा घालतात, व कंबरेस एक पट्टा बांधून तो रंगीत कांच्यानें गुंडळितात. ह्या झग्याच्या वरच्या भागांत पुष्कळ थैल्या केलेल्या असतात, त्यांत सर्व प्रकारचे जिन्नस भरलेले असतात; तसेंच सडकें, नासकें मांस किंवा मासा असल्यास तो जेवते वेळेसमिष्टान्नाप्रमाणें चव घेऊन खातात. हे लोक नेहमीं मोठे लांब लांब सुरे आपल्या कंबरेस खोंचून 'ठेवितात. स्त्रीपुरुष दागिने घालतात; ते रुप्याचे असतात. फक्त त्यांत सोन्याचें कोंदण असतें, किंवा फिरोझावैदुर्य असतें. कानांत मोठाल्या सोन्याच्या भिगबाळया किंवा बुगडया असतात; त्या इतक्या जड असतात कीं, कानाचा, खा-

ळ्चा भाग फारच लोंबू लागून विद्रूप दिसतो, स्त्रिया आपला गळा पोंवळ्यांनीं, कांचेच्या मण्यांनीं, अंबरांनीं, अकीक, गोमेद, यांनीं भरून काढितात. ह्या दागिन्यांवरून समजावयाचें कीं, घरांतला खर्च जाऊन हे बाकी राहिलेल्या शिलकेचे आहेत. स्त्रिया व पुरुष हीं मोठीं धिप्पाड व उंच बांध्याचीं असतात. मोठें ओझें नेण्या आणण्यांत हे फार मजबूत असतात. हे बोजा पाठीवर घेऊन तो मजबुतीसाठीं एका पट्ट्यानें कपाळावरून पाठीमागें बांधतात; त्यामुळें त्यास गाइटरचा रोग होतो असें आढळून आलें आहे. माझ्यामतें त्यांच्या राहण्याच्या जागेवरून तो होत असावा, असें वाटतें. हे लोक मोठे उद्योगी आहेत. यांच्या बायका जेव्हां रिकाम्या असतात, तेव्हां घरांत विणण्याचें काम करितात; व स्वतःसाठीं कपडे तयार करितात. हे लोक दुधासाठीं ढोरें ठेवतात. आणि तीं सरकारी कुरणांत पाठवितात; व दूध दार्जिलिंग येथें विकण्यास आणतात. त्यांच्यांत अनेक नवरे करण्याची चाल आहे. ही जात आडदांड व बेमुर्वत आहे. लग्नाचा फारसा विचार रहात नाहीं. हे अतिशय छाकटे आहेत. हे स्वतःच गहू, तांदूळ व साल यांपासून दारू बनवितात. हे बुद्धधर्मी ह्मणवितात, परंतु तो फारच वाईट रीतीनें पाळतात. यांच्या घरांसभोंवतीं मोठमोठ्या पताका लावलेल्या असतात; व त्यांवर "ओम् मानि पद्मी ओम्" अशीं अक्षरें लिहिलेलीं असतात. कित्येक भुटियेसारखे फिरत असतात; पण व्यापार करतात. त्यांच्याबरोबर गुरेंढोरें असून ते मीठ, लांकुड, कस्तुरी वगैरेचा व्यापार तिबेटन लोकांशीं करितात. ते लोक मेलेल्या मनुष्यास डोंगराच्या शिखरावर नेऊन पुरतात. व त्याच्यावर पाषाण रचतात. त्यांचा धर्म तिबेटन लोकांसारखा आहे. त्यांची वस्ति दार्जिलिंगच्या पांच सहा मैलांच्या आंत आहे. ते लोक घाणेरडे असून मातीचीं घरें बांधून राहतात.

**नेपाळी लोक**—चहाची लागवड करण्यासाठीं नेपाली लोक येथें बरेंच आले. ते फार उद्योगी असल्यानें सर्वांत पुढें सरसा-

वून, मुलांबाळांसह येथें वसाहत करून राहिले आहेत. हे लोक शेतकी, लोहार काम, आणि शिंपीकाम यांत उत्तम कुशल आहेत; ह्यामुळें त्यांचा पाहिजे त्याठिकाणीं उदरनिर्वाह होतो, आणि त्यांस पैसेहि मिळतात. हे लोक घरकाम व खासदाराचें काम चांगल्या तऱ्हेनें करितात, व उपयोगी पडतात. हे लोक कंगालस्थितीमुळें, कर्जाचे त्रासानें, व देशपार केल्याकारणानें येथें येऊन कायमचे राहतात. त्यांस स्वदेशीं जाण्यास पैसे भरावे लागत असल्याकारणानें स्वदेशीं न जातां परदेशांतच राहणें त्यांस बरें वाटतें. ह्यांच्यांत जाती पुष्कळ आहेत. परंतु त्या कामधंद्यावरून झालेल्या दिसतात. त्याखालीं लिहिल्याप्रमाणें होतः—

( १ ) गुरुंगस—हे लोक धनगराचा धंदा करणारे असून नेपाळच्या पर्वतांवर व रानांत मेंढरें राखून व कांहीं कामधंदा करून उदरनिर्वाह करितात. ( २ ) घालिया–हे लोक ह्मशी वगैरे राखून गवळ्याचा धंदा करणारे आहेत. ( ३ ) नेवारलोक–हे शेतीभाती करून चण्यांचा व्यापार दुकान घालून करितात. व गवंड्याचा धंदा पण फार सुरेख करितात. त्यामुळें घरें नीटनेटकीं बांधून गांवचे गांव वसवितात. स्त्रियांची चालचलणूक फारच वाईट रीतिची आहे. ह्यांचा धर्म दोन्ही प्रकारचा आहे. हिंदुधर्म किंवा बौद्धधर्म. ह्यांच्यांत गोमांस वगैरे खातात. ( ४ ) सारकी लोक–हे चामडीं रंगविण्याचा व मठ विकण्याचा धंदा करितात. ( ५ ) कामी लोक–लोहारकाम करितात. ( ६ ) डामाई लोक–शिंपीकाम करितात. ( ७ ) मुरमिस हे गुरेंढोरें बाळगून शेतकी करणारे आहेत. हे दिसण्यांत साधे असून बलाढ्य हुशार व चपळ आहेत. ( ८ ) ब्राह्मण लोक. ( ९ ) खांबलोक. ( १० ) लिंबुस लोक. ( ११ ) टाकलोक. ( १२ ) मंगार लोक.

हे लोक बांध्यांत ठेंगणे, सडपातळ, चपळ, शूर व हुशार असून शिपाई बाण्याचे आहेत. गुरखा लोकांची रेजिमेन्ट फारच

लढाऊ असते. हे नेहमी आपल्याबरोबर कुकरी, जंबिया ठेवितात. त्यांचा धर्म हिंदु व बौद्धमिश्रित आहे. नेपाळी लोकांस शिकारीचा फारच नाद असतो; त्यामुळें हे लोक पक्षांचें तर काळच समजावयाचे! ह्यानीं असें न करण्याबद्दल बऱ्याच तजवीजी झाल्या आहेत.

ह्या पहाडी प्रदेशांत ह्या लोकांशिवाय दुसरेहि लोक राहतात, तेः—माग्रास, नेपालच्या खालच्या बाजूस राहतात. ते ( इंग्रजी ) सिकीममध्यें वसाहत करून राहिले आहेत; त्याचप्रमाणें मुरमिस लोकहि आहेत.

**तिबेटन लोक**—हे दार्जिलिंग येथें थंडीमध्यें घोडीं, याक, बकरीं, शेळया, सैंधव व कस्तुरी इत्यादि घेऊन विकण्यासाठीं येतात व ह्या जिन्नसा विकून परत तंबाखू, जाडें व बारीक कापड इत्यादि घेऊन जातात. लेबाँग सुळक्यावर ते तंबु ठोकून राहतात. त्यांच्यामध्यें एका स्त्रीनें अनेक पति करण्याची रीत आहे. एका तंबूंत एक बायको व पांच सहा पुरुष असावयाचेच! त्यांची मुद्रा मंगोलियन तऱ्हेची असून, ते मध्यम बांध्याचे व मजबूत असतात. ते दाढीमिशी ठेवीत नाहींत; चिमट्यांनीं उपटून काढितात. तसेंच केस मोकळे ठेवीत नाहींत; तर वेणी घालतात. त्यांचा पोषाख म्हटला म्हणजे, एक कांबळ्याचा झगा व कंबरेस चामड्याचा पट्टा असतो. त्यांत त्यांची तंबाखू ओढण्याची पाईप, सुरा, चिमटा, तंबाकूची पिशवी, लांकडी कटोरा, चकमकीची पेटी, आणि इतर जरुरीच्या जिनसा लटकाविलेल्या असतात. बायकांचा पोषाक बहुतकरून पुरुषांसारखाच असतो; परंतु झग्यावर एक कुडतें अडकविलेलें असतें; तें पितळेच्या किंवा रुप्याच्या सांखळीनें अडकविलेलें असतें. त्यांचे तोंडावर प्रवास करतांना डांबर मिसळलेले काजळ लाविलेलें असतें, त्याच्या योगानें डोंगरांतील हवेपासून त्यांचा बचाव होतो. स्त्रीपुरुष सारखेच दागिने घालतात. आंगठ्या, भिगबाळ्या, सरी, बाजुबंद, ताईत इत्यादि दागिन्यांचे प्रकार

आहेत. त्याची एकमेकांस भेटण्याची रीत मोठी विलक्षण आहे ती अशी कीं, जीभ बाहेर काढणें, दांत विचकणें, डोकें हालवा याचें आणि कान खाजवावयाचा. ही चाल त्यांच्यांतच आहे. इ रांत उपहासास्पद गणितात. ह्या सर्व जाती एकमेकांपासून भि असून त्यांच्या वसाहती जवळ जवळ कशा राहिल्या, व मो, तुंबळ युद्धें न होतां, आज तागाईत ते शांततेनें कसे राहिले, मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! येथें निरनिराळया जातींचे लोक र हतात; त्यामुळें ते ज्या भाषा बोलतात, त्या येणेंप्रमाणें:- लेपचा, भुटिया, नेपाली, टिबेटन, हिंदी, बेंगाली, आणि हिंदु स्थानी; व लामालोक संस्कृत समजतात, व लिहितात. हे स जातींचे लोक एकाच ठिकाणीं अनायासें पाहणें असल्यास, दार्जि लिंग येथें दर रविवारीं बाजार भरत असतो, त्यावेळीं (आसपा सचीं चहाचे मळ्यांत काम करणारी मंडळी) चित्रविचित्र पोषाव करून येतात, त्यावेळेस पाहण्यास सांपडतात.

२३९

---

## लामा लोकांबद्दल दोन शब्द.

हे लोक लेपचा, मेची, नेपाली, भुटिया लोकांस पूज्य आहेत. ते मूळचे तिबेटचे राहणारे आहेत; त्यांचे मठ खालसा व स्वतंत्र सिकीमभर अनेक पसरलेले आहेत. खुद्द टिबेटमध्यें तर अगणित आहेत. ह्यांस गुंफा ह्मणतात. हे बहुतकरून पर्वतांच्या उंच शिखरावर असतात, एक दगडी ओटा करून त्यापुढें लांकडाचा कठडा बांधतात. ह्याचा नमुना भुटिया वस्तीकडे दार्जिलिंग येथें असल्यानें, सहज ध्यानांत येईल. ह्यांत हस्तलिखित संस्कृत, चिनी, टिबेटी भाषेंत पुष्कळ महत्वाचे ग्रंथ असतात. ह्या लोकांचा मुख्य धंदा ह्मटला ह्मणजे, पुस्तकें लिहून काढणें व छापणें आणि त्यांचा अर्थ करून लोकांस सांगणें, हा होय. दुसरे लामा लोक पूजा सामुग्रीचें सामान, धुपारती, बांसरी, सिटी, प्याले इत्यादि करितात. तिसरे लामा, वैद्यकीचा, मंत्रतंत्रांचा, व (सर्व

REFBK-0000239
REFBK-0000239